# सहायक/ विक्रीकर निरीक्षक (पूर्व परीक्षा) २००९
# परीक्षेचा दिनांक : २९ /नोव्हेंबर /२००९
# संच : B (mpscmaterial.com)

१) भारतात (२००१ नुसार) सर्वात जास्त क्षेत्रफळ असलेले राज्य :
१) मध्य प्रदेश २) उत्तर प्रदेश
३) बिहार ४) राजस्थान

२) .... हे संयुक्त राष्ट्रांचे महासचिव आहेत.
१) बुत्रोस घाली २) शशी थरूर
३) बान की मून ४) कोफी अन्नान

३) महारवाड्यात राहणाऱ्या गंगाराम कांबळे यास चहाचे दुकान कोणी घालून दिले ?
१) डॉ. आंबेडकर २) महात्मा फुले
३) राजर्षी शाहू ४) वरीलपैकी कोणीही नाही

४) भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ब्रिटनचे पंतप्रधान कोण होते ?
१) हेरॉल्ड विल्सन २) विस्टन चर्चिल
३) अँथनी इडन ४) क्लेमेंट ॲटली

५) पुणे येथे अस्पृश्यांसाठी सर्वप्रथम शाळा कोणी सुरू केली ?
१) राजर्षी शाहू
२) कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे
३) महात्मा जोतीराव फुले
४) अण्णाभाऊ साठे

६) सोडवा.

$$\frac{x}{2}+\frac{2x}{5}-\frac{x}{3}=\frac{17}{30}; x=....$$

१) २ २) -१ ३) १ ४) ५

७) 'विधवा विवाहोत्तेजक मंडळाची' स्थापना १८९३ मध्ये .... यांनी केली.
१) विठ्ठल शिंदे २) महर्षि कर्वे
३) आगरकर ४) महात्मा गांधी

८) कांदा ही .... वनस्पती आहे.
१) एकबिजपत्री २) द्विबिजपत्री
३) अनावृतबिज ४) नेचोद्भिदी

९) $\sqrt{\frac{45}{80}} = ?$

१) $\frac{3}{5}$ २) $\frac{9}{16}$ ३) $\frac{4}{3}$ ४) $\frac{16}{9}$

१०) ग्रामपंचायत प्रशासनावर देखरेख ठेवण्याचे व मार्गदर्शन करण्याचे काम कोण करते ?
१) पंचायत समिती २) जिल्हा परिषद
३) ग्रामसभा ४) स्थायी समिती

११) महाराष्ट्रातील पहिला वायुविद्युत प्रकल्प कोणत्या जिल्ह्यात आहे ?
१) नाशिक २) रत्नागिरी
३) सिंधुदुर्ग ४) पुणे

१२) व्यवहारी अपूर्णांकात लिहा :
१.२५

१) $1\frac{1}{4}$ २) $2\frac{1}{4}$ ३) $1\frac{1}{2}$ ४) $2\frac{1}{3}$

१३) "आगा खान कप"... या खेळाशी संबधित आहे.
१) फुटबॉल २) बॅडमिंटन ३) हॉकी ४) क्रिकेट

१४) राज्य मंत्रिमंडळ संयुक्तरित्या कोणाला जबाबदार असते ?
१) राज्यसभा २) लोकसभा
३) विधानसभा ४) विधानपरिषद

१५) $\frac{(0.6)^2+(0.3)^2+(0.6)^2}{(0.6)^2-(0.3)^2}=?$

१) ०.३ २) ०.९ ३) ३ ४) ९

१६) ठाणे जिल्ह्यातील घोलवड येथील .... लोकप्रिय आहेत.

१) आंबे २) चिकू ३) द्राक्ष ४) नारळ

१७) मानवामध्ये... गुणसूत्रे असतात.

१) ६४ २) ४६ ३) २३ ४) ४४

१८) महाराष्ट्राची सागरी किनारपट्टी...कि.मी. आहे.

१) ७२० २) ८८० ३) ४२० ४) २२०

१९) ..... हे भारताचे पितामह म्हणून ओळखले जातात.

१) महात्मा गांधी २) दादाभाई नौरोजी

३) गोपाळ कृष्ण गोखले ४) मोतीलाल नेहरू

२०) पश्चिम बंगालमध्ये गडगडाटी वादळांना ... म्हणतात.

१) आम्रझरी २) लू

३) आँधी ४) कालबैसाखी

२१) पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी 'व्हिजन डॉक्युमेंटस् २०२०'कोणासाठी जाहीर केले?

१) शिक्षकांसाठी २) नागरी विकासासाठी

३) महिलांसाठी

४) ईशान्य भारताच्या विकासासाठी

२२) भारतीय संघराज्यात किती घटकराज्ये व केंद्रशासित प्रदेश आहेत ?

१) २८ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश

२) २७ घटकराज्ये आणि ५ केंद्रशासित प्रदेश

३) २८ घटकराज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेश

४) ३५ घटकराज्ये आणि ७ केंद्रशासित प्रदेश

२३) खालीलपैकी कोणते शहर मुंबई-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गावर वसलेले आहे ?

१) नाशिक २) सांगली

३) सोलापूर ४) कोल्हापूर

२४) देहवस्तुमान निर्देशांक =....

(सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)

१) वजन$^2$/उंची$^2$ २) वजन$^2$/उंची

३) वजन/उंची$^2$ ४) वजन/उंची

२५) आधुनिक आवर्त सारणीत....आवर्त आहेत.

१) ७ २) ८ ३) १६ ४) १८

२६) $64x^2+16x+1=$.......

१) $(8x+4)^2$ २) $(4x+1)^2$

३) $(8x+1)^2$ ४) $(16x+8)^2$

२७) धातूच्या वाहकामध्ये भारवहनाचे कार्य कोण करतो ?

१) प्रोटॉन्स २) इलेक्ट्रॉन्स

३) आयन्स ४) न्युट्रॉन्स

२८) चंद्राच्या वैज्ञानिक संशोधनासाठी २००८ मध्ये भारताने कोणते अंतराळ यान सोडले ?

१) सोमयान-I २) चांद्रयान-I

३) शशीयान-I ४) अग्नी-I

२९) संसदेत महिलांना किती टक्के जागा राखीव असाव्यात अशी मागणी करण्यात येते ?

१) ३५ २) ४५ ३) ३३ ४) ३०

३०) "शिका, संघटित व्हा आणि चळवळ करा" हा संदेश ... यांनी दलित तरूणांना दिला.

१) महात्मा फुले २) महर्षी कर्वे

३) गो. ग. आगरकर ४) डॉ. आंबेडकर

३१) सोडवा. $\sqrt{(x+y)^2}=$...

१) $x-y$ २) $x+y$ ३) $(x+y)^{\frac{1}{3}}$ ४) $(x+y)^2$

३२) बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना कोणी केली ?

१) धोंडो केशव कर्वे २) विठ्ठल रामजी शिंदे

३) महात्मा फुले ४) राजर्षी शाहू

३३) भारतातील पंचवार्षिक योजनांची सुरूवात.... या वर्षी झाली.

१) १९४७ २) १९४८ ३) १९५० ४) १९५१

३४) पुढीलपैकी कोणता एक मार्ग ग्रामपंचायतीला महसूल देणारा नाही ?

१) सरकारी अनुदान

२) जमिनीवरील स्थानिक कर

३) आयकर ४) घरावरील कर

३५) एका विद्युत इस्त्रीचा रोधा २० Ω आहे. जर तिच्यातून १A विद्युत धारा पाठविली, तर १ मिनिटात किती ज्युल उष्णता निर्माण होईल ?

१) १२०० २) २८५.७

३) २० ४) १२०

३६) खालील अंकगणितीय श्रेणीतील पुढील एक संख्या शोधा.

२४, २१, १८, १५, ....

१) १२ २) १४ ३) ९ ४) ३

३७) डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांच्या अधिकारांसाठी सुरू केलेली संघटना :

१) दलितोद्धार सभा

२) सार्वजनिक सत्यधर्म

३) डिप्रेस्ड क्लास मिशन

४) बहिष्कृत हितकारिणी

३८) **विधान:** अ) मेरठ येथील शिपायांनी बंड केले.

**कारण:** ब) मंगल पांडेला फाशी देण्यात आली

१) अ) बरोबर आहे पण ब) चुकीचे आहे.

२) अ) चुकीचे आहे पण ब) बरोबर आहे.

३) अ) आणि ब) दोन्ही बरोबर आहेत पण ब) हे अ) चे स्पष्टीकरण नाही.

४) अ) आणि ब) दोन्ही बरोबर आहे व ब) हे अ) चे स्पष्टीकरण आहे.

३९) एका संख्येत तिची निमपट मिळविल्यास १२३ मिळतात. तर ती संख्या.....

१) ७२ २) ८४ ३) ८२ ४) ७०

४०) पाकिस्तानचे पंतप्रधान युसूफ रझा गिलानी हे कोणत्या पक्षाचे आहेत ?

१) पाकिस्तान पिपल्स पार्टी

२) अवामी नॅशनल पार्टी

३) मुस्लीम लीग ४) जमात-ई-इस्लामी

४१. "औरंगजेबाने जे मुगल साम्राज्यात केले, तसेच लॉर्ड कर्झनने केले." असे कोणी लिहिले ?

१) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक

२) स्वातंत्र्यवीर सावरकर

३) लाला लाजपतराय

४) वरीलपैकी कोणीही नाही

४२) १९८५ चे भारत जोडो आंदोलन कोणी सुरू केले ?

१) अहिल्या रांगणेकर २) अण्णा हजारे

३) बाबा आमटे

४) लालकृष्ण अडवाणी

४३) ग्रामपंचायतीचा सचिव कोण असतो ?

१) ग्रामसेवक २) सरपंच

३) गटविकास अधिकारी ४) उपसरपंच

४४) द्वितीय श्रेणी व्यवसाय असणाऱ्या .... या परिसरात दाट लोकवस्ती आहे.

१) लातूर-उस्मानाबाद २) जळगाव-भुसावळ

३) पंढरपूर-सोलापूर ४) पिंपरी-चिंचवड

४५) महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या सदस्यांची नियुक्ती कोण करतात ?

१) राष्ट्रपती २) राज्यपाल

३) पंतप्रधान ४) कॅबिनेट मंत्री

४६) सर ए. ओ. ह्यूम यांनी...विद्यार्थ्यांना पत्र लिहिले होते.

१) मुंबई विद्यापिठाच्या

२) कलकत्ता विद्यापिठाच्या

३) दिल्ली विद्यापिठाच्या

४) मद्रास विद्यापिठाच्या

४७) भारताच्या स्वातंत्र्यापूर्वी खालीलपैकी कोणत्या घटनांनी जनमाणसाचे मत इंग्रजांविरूद्ध जागृत करण्यात आले होते ?

१) नीळे संबंधित उठाव इ.स. १८५९-६०

२) कुकी येथील उठाव इ.स. १८६०-९०

३) पावना येथील शेतकरी उठाव इ.स.१८७२-७३

४) वरील तिन्ही उठाव

४८) ... मध्ये 'ट्रान्स्फर ऑफ पॉवर' कायदा पास करण्यात आला.

१) इ.स. १८५७ २) इ.स. १८५८

३) इ.स. १८५९ ४) इ.स. १८६०

४९) भारताचा व्हाईसराय लॉर्ड .....याने इ.स. १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली.

१) वेलस्ली २) डलहौसी
३) कर्झन ४) कॅनिंग

५०) .... यांना महाराष्ट्राचे 'मार्टिन ल्यूथर' म्हणतात.
१) लोकमान्य बाळ गंगाधर टिळक
२) लोकहितवादी ३) महात्मा फुले
४) न्याय. महादेव गोविंद रानडे

५१) ...... यांनी 'मित्रमेळा' ही क्रांतिकारी संघटना इ.स. १९०० मध्ये स्थापन केली.
(सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)
१) वि. दा. सावरकर २) कान्हेरे बंधू
३) बाबाजी सावरकर ४) दामोदर चापेकर

५२) भारतातील पहिला रासायनिक खतांचा कारखाना ... येथे स्थापन करण्यात आला.
१) मुंबई २) सिंद्री ३) हैद्राबाद ४) जयपूर

५३) शाहू महाराजांनी राजाराम महाविद्यालयाचे हस्तांतरण .... यांच्याकडे केले.
१) आर्यसमाज २) प्रार्थनासमाज
३) ब्राम्होसमाज ४) थिऑसॉफिकल सोसायटी

५४) वुमेन्स इंडियन असोसिएशनची स्थापना..... यांनी केली.
१) ॲनी बझंट २) सरलादेवी चौधरी
३) लेडी टाटा ४) कमला नेहरू

५५) एका भिंगाचे नाभीय अंतर ५० cm आहे. त्या भिंगाची शक्ती किती diopter आहे ?
(सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)
१) ०.२ २) −०.२ ३) २ ४) −२

५६) $2+\frac{1}{5}+\frac{1}{50}+\frac{1}{500}=$.....
१) २२.२२ २) २.२२२
३) ११.११ ४) १.१११

५७) ध्वनीच्या तीव्रतेचे एकक...आहे.
१) मीटर/सें. २) वॅट
३) डेसिबल ४) हर्ट्झ

५८) राज्याच्या राज्यपालांची नियुक्ती ...कडून होते.
१) भारताचे सरन्यायाधीश २) राष्ट्रपती
३) त्या राज्याचे मुख्यमंत्री ४) पंतप्रधान

५९) जर (4, a ) हा बिंदू $7x+2y=42$ या समीकरणाचे समाधान करत असेल तर, 'a' ची किंमत काढा.
१) ७ २) ९ ३) ७१८ ४) ६

६०) डी.एन.ए. म्हणजे ....
१) डेव्हलपिंग न्यूक्लीक ॲसिड
२) डीऑक्सीरायबो न्यूक्लीड ॲसिड
३) डेरिबो न्युक्लीक ॲसिड
४) डीक्रीझींग न्यूक्लीक ॲसिड

६१) खालीलपैकी कोणता सर्वोत्कृष्ट प्रतीचा खनिज कोळसा आहे ?
१) अँथ्रासाईट २) पीट
३) बिट्युमिनस् ४) लिग्नाईट

६२) "रोजगार हमी योजना" प्रथम ... या राज्याने राबविली.
१) राजस्थान २) गुजरात
३) उत्तर प्रदेश ४) महाराष्ट्र

६३) लोकमान्य टिळक यांनी ....यांच्या मदतीने मराठा व केसरी ही वर्तमानपत्रे सुरू केली.
१) गोपाळ गणेश आगरकर २) न्या. रानडे
३) लोकहितवादी ४) गोपाळ कृष्ण गोखले

६४) अभिनव बिंद्रा हा प्रसिद्ध... आहे.
१) समाज सेवक २) अभिनेता
३) खेळाडू ४) पत्रकार

६५) खालीलपैकी कोणते ठिकाण लाकडी खेळणी बनविण्यासाठी प्रसिद्ध आहे ?
१) वेंगुर्ले २) मालवण
३) कणकवली ४) सावंतवाडी

६६) हृदय प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया सर्वप्रथम या देशात झाली.
१) अमेरिका (यु.एस.ए.) २) कॅनडा
३) दक्षिण आफ्रिका ४) ब्रिटन

६७) खालीलपैकी कोणती संख्या ८ व ९ च्या दरम्यान आहे ?
१) $\frac{25}{3}$ २) $\frac{8}{3}$ ३) $\frac{25}{4}$ ४) $\frac{20}{7}$

६८) स्वातंत्र्याच्या हक्काचा समावेश भारतीय राज्य घटनेच्या.... या कलमात करण्यात आला आहे.

१) १४ ते १८ २) १९ ते २२

३) २५ ते २८ ४) २३ ते ३०

६९) खालीलपैकी कोणत्या राज्यात 'कोयना जलविद्युत प्रकल्प' आहे ?

१) मध्य प्रदेश २) महाराष्ट्र

३) केरळ ४) ओरिसा

७०) महाराष्ट्रात सर्वात जास्त पाऊस ... येथे पडतो.

१) तोरणमाळ २) अंबोली

३) गडचिरोली ४) चिखलदरा

७१) सोलर कुकरची पेटी आतील बाजूस..... रंगाने रंगवलेली असते.

१) लाल २) पिवळा ३) पांढरा ४) काळा

७२) भारतीय नागरिकत्वाचा कायदा... साली मंजर झाला.

१) १९६० २) १९५५ ३) १९४९ ४) १९५०

७३) तीन लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या नगरपालिका क्षेत्रांमध्ये .... स्थापन करण्याची तरतूद आहे.

१) वॉर्ड २) पंचायत समिती

३) मोहल्ला कमिटी ४) वॉर्ड समिती

७४) .... हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे संस्थापक होते.

१) ए. ओ.ह्यूम २) सुरेंद्रनाथ बॅनर्जी

३) लॉर्ड डफरिन ४) लार्ड रिपन

७५) महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यामध्ये जंगलाखालील जमिनीचे प्रमाण सर्वाधिक आहे ?

१) गडचिरोली २) चंद्रपूर

३) भंडारा ४) कोल्हापूर

७६) सहाव्या वेतन आयोगाचे अध्यक्ष कोण होते ?

१) न्या.बी.एन्. श्रीकृष्ण

२) न्या.सी.जी. परमानंद

३) न्या.जी.एल्. गणेशन

४) न्या.एम्.डी. कापेगांवकर

७७) २००८ मध्ये डाव्या पक्षांनी केंद्रातील संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारचा पाठिंबा कोणत्या मुद्यावरून काढून घेतला ?

१) गरिबी

२) भारत-अमेरिका नागरी अणु करार

३) शेतकऱ्यांच्या आत्महत्या ४) बेरोजगारी

७८) चीन, भारत, मेक्सिको, ब्राझील आणि दक्षिण आफ्रिका यांच्या संघटनेला काय संबोधतात ?

१) जी-०८ २) जी-०५

३) जी-१५ ४) जी-०४

७९) 'मिहान' (MIHAN) नामक महत्त्वाकांक्षी प्रकल्प .... येथे आकार घेत आहे.

१) नाशिक २) नांदेड

३) नागपूर ४) नवी मुंबई

८०) भारतीय नियोजन आयोगाचे अध्यक्ष कोण आहेत ?

१) अर्थमंत्री २) पंतप्रधान

३) राष्ट्रपती ४) राज्यपाल

८१) 'श्वास' या चित्रपटाच्या कथा लेखिका कोण?

१) गौरी देशपांडे २) अरूणा ढेरे

३) माधवी घारपुरे ४) आशा बगे

८२) टाटा लोह आणि पोलाद कारखाना कोठे आहे?

१) भुवनेश्वर २) दुर्गापूर

३) भिलाई ४) जमशेदपूर

८३) एक अश्वशक्ती =....

१) ७४६ watt २) २७६ watt

३) १००० watt ४) १००० erg/s

८४) .... येथे डॉ. आंबेडकरांनी मंदिर प्रवेश सत्याग्रह केला.

१) महाड २) औरंगाबाद ३) नाशिक ४) मुंबई

८५) राजर्षी शाहू महाराज...संस्थानाचे अधिपती होते.

१) बडोदा २) कोल्हापूर

३) सातारा ४) नागपूर

८६) भारतात आणीबाणी.... पंचवार्षिक योजनेत लादण्यात आली होती.

(सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)

१) पाचव्या २) सहाव्या
३) चौथ्या ४) वरीलपैकी कोणतेही नाही

८७) निवडुंग आपले अन्न कोठे तयार करते ?
१) खोडामध्ये २) पानांमध्ये
३) फांद्यांमध्ये ४) मुळांमध्ये

८८) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसला 'सुरक्षा कवच' कोणी म्हटले आहे ?
१) सुरेंद्रनाथ बॅनर्जी २) न्या. रानडे
३) ॲनी बेझंट ४) ॲलन ह्यूम

८९) राजर्षी शाहू महाराजांनी विधवांच्या पुनर्विवाहास मान्यता देणारा कायदा.... यावर्षी आपल्या राज्यात आणला.
१) इ.स.१९१६ २) इ.स.१९१७
३) इ.स.१९१८ ४) इ.स.१९१९

९०) एका संख्येचे २५% म्हणजे ७५, तर ती संख्या शोधा.
१) ६०० २) ३०० ३) १५० ४) ४५०

९१) पुण्याहून दुपारी ४.०० वा. निघालेली कार, त्या दिवशी रात्री ९.०० वा. दादरला पोहोचली, त्या कारचा वेग ताशी ३२.४ कि.मी. असल्यास पुणे ते दादर अंतर किती?
१) २६२ कि.मी. २) २८२ कि.मी
३) १६२ कि.मी. ४) २१६ कि.मी.

९२) इ.स. १९१५ मध्ये ॲनी बेझंट यांनी .... या प्रांतात होमरूल लीगची स्थापना केली.
१) मद्रास २) महाराष्ट्र ३) ओरिसा ४) बंगाल

९३) भारतातील सर्वश्रेष्ठ कायदा अधिकारी कोण?
१) महाअधिवक्ता
२) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश
३) कायदा मंत्री ४) महान्यायवादी

९४) मराठीमधील पहिल्या विश्व साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण?
१) राम शेवाळकर २) द.मा. मिरासदार
३) गंगाधर पानतावणे ४) नारायण सुर्वे

९५) जैविक रेणूंची रचना, रासायनिक गुणधर्म आणि कार्य यांचा अभ्यास करण्याच्या शास्त्राला .... म्हणतात.
१) जीवाश्मशास्त्र २) जीवशरीरमापनशास्त्र
३) पेशीविज्ञान ४) जीवरसायनशास्त्र

९६) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे दुसरे अधिवेशन... येथे झाले.
१) मुंबई २) मद्रास ३) कलकत्ता ४) पुणे

९७) १० रूपयांच्या नोटांच्या पुडक्यात ८७२५६ पासून ८७२८० पर्यंत क्रमांक आहेत तर एकूण रक्कम किती?
१) २४० २) २५० ३) २२५ ४) २२०

९८) भारतीय प्रमाणवेळ (I.S.T.) ही ग्रीनिच प्रमाण-वेळेपेक्षा (G.M.T.)... तासांनी पुढे आहे.
१) अडीच २) तीन
३) साडे चार ४) साडे पाच

९९) किती किलोबाईट्स म्हणजे एक मेगाबाईट होय?
१) १०० २) १०,००० ३) १,००० ४) ५००

१००) अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापन करण्यामागे कोणता हेतू होता ?
१) भारतीयांमध्ये ब्रिटिशाविषयीचा असंतोष कमी करणे.
२) ब्रिटिशांसाठी सुरक्षाकवच निर्माण करणे.
३) (१) आणि (२) दोन्ही बरोबर
४) (१) आणि (२) दोन्ही चूक

१०१) कोतवालाची नेमणूक कोण करतो ?
१) मुख्यमंत्री २) सरपंच
३) तहसिलदार ४) गटविकास अधिकारी

१०२) खालीलपैकी कोणता वृक्ष उष्ण कटिबंधीय सदाहरित जंगलामध्ये आढळतो ?
१) अंजन २) महोगनी ३) पिंपळ ४) पळस

१०३) कशाच्या अभावाने पेलाग्रा होतो ?
१) नायसिन २) थायमिन
३) रेटिनॉल ४) ॲस्कार्बिक आम्ल

१०४) भारतीय संविधानातील खालीलपैकी कोणत्या तरतुदीमध्ये राज्यांमध्ये राष्ट्रपती शासन लागू करता येते ?
१) अनुच्छेद २५६ २) अनुच्छेद २८६

३) अनुच्छेद ३५६ ४) अनुच्छेद ३७०

१०५) जागतिक व्यापार संघटनेचे मुख्यालय... येथे आहे.

१) जिनिव्हा २) पॅरिस ३) न्यूयॉर्क ४) रोम

१०६) जर $\frac{a}{b}=\frac{9}{5}$ तर $\frac{a+b}{a-b}=?$

१) $\frac{5}{9}$ २) $\frac{14}{5}$ ३) $\frac{2}{7}$ ४) $\frac{7}{2}$

१०७) ग्रीन व्हिट्रिऑल.... आहे.

१) कॉपर सल्फेट २) फेरस सल्फेट

३) पोटॅशियम सल्फेट ४) अल्युमिनियम सल्फेट

१०८) एल्.टी.टी.ई. हा दहशतवादी गट खालीलपैकी कोणत्या देशात कार्यरत आहे.

१) भारत २) पाकिस्तान ३) चीन ४) श्रीलंका

१०९) $6^5 \div 6^2 = 6^*;=....$

१) ३ २) ५ ३) ७ ४) २

११०) एका संख्येमधून १६ वजा केले असता, येणारी संख्या त्या संख्येच्या एक तृतीयांश एवढी असते तर, ती संख्या काढा.

१) १२ २) ३६ ३) २४ ४) १६

१११) खालीलपैकी कोणते उद्दिष्ट्य भारतीय संविधानाच्या मूलभूत कर्तव्यांमध्ये समाविष्ट नाही ?

१) तिरंग्याचा मान राखणे

२) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे

३) सैन्यदलात सेवा करणे

४) आपल्या संस्कृतीचे जतन करणे

११२) पाच अंकी लहानात लहान संख्येला तीन अंकी लहानात लहान संख्येने भागल्यास उत्तर काय येईल?

१) १००० २) १०००० ३) १०० ४) १०

११३) खालीलपैकी कोणत्या लोह पोलाद कारखान्याची स्थापना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत झालेली नाही.

१) भिलाई २) दुर्गापूर

३) रूरकेला ४) बोकारो

११४) हत्तीपाय रोग .... मुळे होतो.

१) विषाणू २) प्रोटोझोआ

३) मेटोझोआ ४) यापैकी कोणतेही नाही

११५) 'गुलामगिरी' चे लेखक .... आहेत.

१) ज्योतिबा फुले २) महादेव रानडे

३) विष्णू गोखले ४) रामकृष्ण भांडारकर

११६) महाराष्ट्रात सर्वात जास्त जंगलाखालील क्षेत्र..... जिल्ह्यात आहे.

१) बुलढाणा २) सोलापूर

३) चंद्रपूर ४) जळगाव

११७) फेब्रुवारी २००८ मध्ये कोणत्या प्रदेशाने स्वतःला स्वतंत्र राष्ट्र घोषित केले ?

१) सर्बिया २) जॉर्जिया

३) कोसोवो ४) मॉंटिनिग्रो

११८) सातारा जिल्ह्यातील कोणत्या गावात गोपाळ गणेश आगरकरांचा जन्म झाला ?

१) टेंभूर्णी २) टेंभू ३) जामगाव ४) जांब

११९) मुंबई बंदरातील वाहतुकीचा भार कमी करता यावा म्हणून ... हे बंदर विकसित करण्यात आलेले आहे.

१) हल्दिया २) न्हावा-शेवा

३) कांडला ४) मार्मागोवा

१२०) भारत सरकार कायदा १९३५ द्वारे .... प्राप्त झाली.

१) प्रांतीक स्वायत्तता २) वसाहतीचे स्वातंत्र्य

३) संपूर्ण स्वराज्य ४) स्वातंत्र्य

१२१) पेट्रोलमध्ये मिसळले जाणारे इथेनॉल भारतात कशापासून बनवतात ?

१) द्राक्ष २) मका ३) ऊस ४) डिझेल

१२२) महाराष्ट्रात ऊस संशोधन केंद्र कोठे स्थापन झालेले आहे ?

१) लोणंद २) शेखमिरेवाडी

३) पाडेगांव ४) कागल

१२३) संपत्तीच्या/मालमत्तेच्या अधिकाराचे सध्याचे स्वरूप कसे आहे?

१) कायदेशीर अधिकार २) मानवी अधिकार

३) मूलभूत अधिकार ४) नैसर्गिक अधिकार

१२४) हायड्रॉ हा प्राणी .... ह्या संघात मोडतो.

१) प्रोटोझुआ २) सिलेंटरेटा

३) प्लॅटिहेल्मिंथिस ४) ॲनिलिडा

१२५) संतृप्त हायड्रोकार्बनमध्ये दोन कार्बन अणू एकमेकांशी ... बंधाने जोडलेले असतात.

१) एकेरी २) तिहेरी ३) आयनिक ४) दुहेरी

१२६) ५ वी पंचवार्षिक योजना..... या वर्षी थांबविण्यात आली.

१) १९७७ २) १९७५ ३) १९७८ ४) १९८०

१२७) .... मध्ये साबरमती आश्रमाची स्थापना महात्मा गांधीजींनी केली.

१) इ.स.१९१४ २) इ.स.१९१५

३) इ.स.१९१६ ४) इ.स.१९१७

१२८) २००८ मध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष कोण होते?

१) डॉ. अरूण निगवेकर २) डॉ. नरेंद्र जाधव

३) डॉ. सुखदेव थोरात ४) डॉ. विजय खोले

१२९) दशांश अपूर्णांकात लिहा.

$\frac{-13}{25}$ =....

१) -०.५२ २) ०.५२ ३) ०.२५ ४) -०.२४

१३०) राज्यशासनाला कायदेविषयक बाबींवर सल्ला देण्याचे काम.... याचे असते.

१) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

२) सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश

३) महान्यायवादी ४) महाधिवक्ता

१३१) जर, $5(2y+3) = 9(3y-21)$ तर, $y =$.....

१) १४ २) १० ३) १३ ४) १२

१३२) शेतकरी सभेचे तिसरे अधिवेशन ह्या वर्षी झाले....

१) इ.स.१९३६ २) इ.स.१९३७

३) इ.स.१९३८ ४) इ.स.१९३९

१३३) ईशान्य मोसमी वाऱ्यांमुळे ... राज्याच्या तटवर्ती भागात पाऊस पडतो.

१) तामिळनाडू २) महाराष्ट्र

३) पंजाब ४) गोवा

१३४) राज्यकार्यकारी मंडळाचा घटनात्मक प्रमुख कोण असतो ?

१) मुख्यमंत्री २) राज्यपाल

३) कॅबिनेट मंत्री ४) मुख्य सचिव

१३५) छत्रपती शाहू महाराजांनी २५ जून १९१८ रोजी काढलेल्या वटहुकूमाद्वारे कोणती पद्धती बंद केली ?

१) जातवार वसतीगृह २) महार वतन

३) सवर्णांसाठी स्वतंत्र पाणवठे

४) हुंडापद्धती

१३६) आम्लयुक्त पावसात.... वायूंची आम्ले समाविष्ट असतात. (सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)

१) $CO_2$ आणि NO2 २) CO आणि $CO_2$

३) $Cl_2$ आणि $SO_2$ ४) $SO_2$ आणि $NO_2$

१३७) भारतीय मुस्लीम समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक दर्जासंबंधी अहवाल तयार करण्यासाठी नेमलेल्या पंतप्रधानांच्या उच्चस्तरीय समितीचे अध्यक्ष कोण होते ?

१) डॉ. अख्तार माजिद २) सईद हमीद

३) न्यायमूर्ती राजिंदर सच्चर

४) डॉ. राकेश बसंत

१३८) महात्मा फुले यांनी मुलींची शाळा सर्वप्रथम केव्हा आणि कुठे सुरू केली ?

१) ३ जुलै १८४८ रोजी भिडे यांच्या वाड्यात

२) ३ जुलै १८४८ रोजी धनकवडी येथे.

३) ३ जुलै १८४८ रोजी फुले यांच्या स्वतःच्या घरी

४) ३ जुलै १८४८ रोजी शारदाश्रम येथे.

१३९) गोपाळ गणेश आगरकरांचा जन्म कोणत्या वर्षी झाला ?

१) इ.स.१८५५ २) इ.स. १८५६

३) इ.स.१८५७ ४) इ.स.१८५८

१४०) भारतातील हिमालय पर्वत हा... प्रकारचा पर्वत आहे.

१) अवशिष्ट पर्वत २) ठोकळ्याचा पर्वत

३) घडीचा पर्वत ४) ज्वालामुखी पर्वत

१४१) हेपॅटिटिस B... मुळे होतो.

१) HAV 2) HIV

3) मायक्रोबॅक्टेरिअम लेप्री ४) HBV

१४२) जपानच्या हाती सापडलेल्या ब्रिटिश लष्करातील हिंदी सैनिकांची 'आझाद हिंद सेना' .... यांनी स्थापन केली.

१) सुभाषचंद्र बोस २) रासबिहारी बोस

३) डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन्

४) लाला हरदयाळ

१४३) योजना आयोगाच्या उपाध्यक्षांचे नांव ... आहे.

१) डॉ. अहलुवालीया २) प्रणव मुखर्जी

३) पी. चिदंबरम ४) डॉ. मनमोहन सिंग

१४४) स्वयंचलित वाहनातून कोणता विषारी वायू बाहेर पडतो ?

१) कार्बन मोनाक्साईड २) मिथेन

३) कार्बन डायऑक्साईड ४) ओझोन

१४५) शाहू महाराजांनी प्राथमिक शिक्षणासाठी फी माफीची घोषणा दि. ..... रोजी केली. (सदर प्रश्न आयोगाने रद्द केला आहे)

१) २५ जुलै १९१७ २) २१ नोव्हेंबर १९१७

३) २ एप्रिल १८९४ ४) २ जुलै १९१७

१४६) महात्मा फुले यांनी मुलींना व दलितांना शिक्षण घेता यावे म्हणून प्रथम ... येथे शाळा काढली.

१) औरंगाबाद २) पुणे

३) सातारा ४) मुंबई

१४७) "१८५७ चे स्वातंत्र्यसमर" हे पुस्तक कोणी लिहिले ?

१) गणेश दामोदर सावरकर

२) नारायण दामोदर सावरकर

३) विनायक दामोदर सावरकर

४) वरीलपैकी कोणीही नाही

१४८) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खालीलपैकी कोणता ग्रंथ लिहिला ?

१) 'बुद्धीझम' २) 'बुद्ध अॅन्ड हिज धम्म्'

३) 'हिन्दू आणि बुद्ध' ४) 'गौतमबुद्ध'

१४९) 'राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' अंतर्गतः

अ) एका वर्षात किमान १०० दिवस रोजगार पुरविला जातो.

ब) लाभर्थित किमान $\frac{1}{3}$ महिला असतात.

१) अ) आणि ब) दोन्ही बरोबर आहेत.

२) फक्त (अ) बरोबर आहे.

३) फक्त (ब) बरोबर आहे.

४) (अ) आणि (ब) दोन्ही चूक आहेत.

१५०) मुंबई उच्च न्यायालयाचे खालीलपैकी कोणत्या ठिकाणी खंडपीठ नाही ?

१) नागपूर २) पणजी

३) पुणे ४) औरंगाबाद